# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान; मुंबईची केया हटकर आणि अमरावतीच्या करिना थापाचा गौरव
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ
3. राज्यातील जनतेचं राहणीमान सुधारण्याला प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
4. माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांचं निधन आणि
5. राज्यात येत्या दोन दिवसात वीजांसह पावसाचा अंदाज

**<u>बाल पुरस्कार</u>**

असाधारण कामगिरी करणाऱ्या 17 बालकांना कालच्या वीर बाल दिनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारानं गौरवण्यात आलं. शीख धर्मियांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंग यांचे दोन पुत्र, बाबा जोरावरसिंग आणि बाबा फतेहसिंग यांच्या हौतात्म्याचं स्मरण म्हणून हा दिवस पाळला जातो. राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळालेल्या बालकांचं साहस अद्वितीय असून भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपती यावेळी बोलताना म्हणाल्या. कला, संस्कृती, साहस, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक सेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा विविध सात श्रेणींमध्ये केलेल्या असाधारण कामगिरीबद्दल त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार मिळालेल्यांमध्ये मुंबईची 13 वर्षीय केया हटकर आणि अमरावतीची 17 वर्षीय करिना थापा या राज्यातल्या दोन मुलींचा समावेश आहे.केया हटकर ही डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या लोकप्रिय पुस्तकांची लेखिका आहे. कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी तिला या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तर अमरावतीच्या करिना थापा हिला तिनं दाखवलेल्या धाडसाबद्दल बाल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. तिनं अतुलनीय प्रसंगावधान दाखवत आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून 36 जणांचे प्राण वाचवले होते. त्या कठीण प्रसंगाची करिना हिनं सांगितलेली आठवण.....

**<u>पीएम बाल दिवस</u>**

देशाच्या युवाशक्तीमुळे आज जग भारताकडे आशेनं आणि अपेक्षेनं पाहत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अधोरेखित केलं. नवी दिल्लीत काल वीर बाल दिनानिमित्त भारत मंडपममध्ये आयोजित कार्यक्रमाला त्यांनी संबोधित केलं. सरकारी धोरणांमध्ये तरुणांच्या सक्षमीकरणाला सर्वाधिक प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं. देशापेक्षा आणि देशहितापेक्षा कुणी मोठं नाही, अशी शिकवण वीर बाल दिवसामुळे मिळते, असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते सुपोषित ग्राम पंचायत योजनेचा प्रारंभ करण्यात आला.

पोषण आहाराशी संबंधित सेवा सुविधा सामाजिक योगदानातून ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध करुन देणं हे या अभियानाचं उद्दिष्ट आहे.

तत्पूर्वी कार्यक्रमाच्या आधी पंतप्रधानांनी वीर बालपुरस्कार विजेत्यांशी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपरिक समृद्धीचं दर्शन घडवणाऱ्या वेशभूषा केलेल्या मुलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. यामध्ये सांगली शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्यक्षिक सादर केलं. वीर बाल दिवसाचं औचित्य साधून काल मुंबईच्या गोरेगाव इथल्या गुरुद्वारामध्येही विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. शहीद वीर बाल दिवसाच्या निमित्तानं बाल वीरांचं हौतात्म्य आपण नेहमीच स्मरणात ठेऊयात, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांना नमन केलं.

**सीएम बैठक**

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीच्या उद्देशानं शासनाचे सर्व विभाग पुढील 100 दिवसांचा आराखडा तयार करत आहेत. त्याअनुषंगानं उच्च आणि तंत्र शिक्षण तसंच वन आणि कृषि विभागाच्या पुढील 100 दिवसांच्या आराखड्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईतल्या सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. या आराखड्यात लोककेंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगानं नागरिकांना सहजतेनं लाभ मिळण्यासंबंधीच्या योजना तसंच राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या कामगिरीचा समावेश असावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

**सुशासन अहवाल**

कुठल्याही राज्याची प्रगती ही तिथलं राहणीमान किती सुकर आहे यावर अवलंबून असते. त्यामुळे शासनही राज्यातील जनतेचं राहणीमान अधिक सुधारण्यासाठी प्राधान्यानं काम करत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. 2024 महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवालाचं अनावरण काल मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. नागरिकांना विविध सेवा विनाविलंब मिळतात की नाही, यावरून राज्यातील सुशासनाची कल्पना येते. सुशासनाच्या माध्यमातून एक लाख कोटींची अर्थव्यवस्था करण्याचा मार्गही बळकट होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**मनमोहन**

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं काल दिल्लीत निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. डॉक्टर मनमोहन सिंग 33 वर्षांच्या सेवेनंतर या वर्षी एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त झाले. 26 सप्टेंबर 1932 रोजी अविभाजित भारतातील पंजाब प्रांतातील एका गावात जन्मलेल्या, डॉक्टर सिंग यांनी 2004 ते 2014 पर्यंत भारताचे 13 वे पंतप्रधान म्हणून काम केलं. देशाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यामध्ये त्यांचं महत्त्वपूर्ण योगदान होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांनी डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. दरम्यान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल देशभरात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिव देहावर पूर्ण राष्ट्रीय सन्मानानं अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**<u>हुतात्मा अंत्यसंस्कार</u>**

जम्मू काश्मीरमध्ये पूंछ इथं मंगळवारी झालेल्या एका अपघातात मरण पावलेल्या जवानांमध्ये मराठा रेजिमेंटचे नायक शुभम घाडगे आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या पिंपळगाव इथले शिपाई अक्षय निकुरे या राज्यातल्या दोन सैनिकांचा समावेश आहे. त्यापैकी शुभम घाडगे यांच्या पार्थिव देहावर काल त्यांच्या मूळ गावी सातारा जिल्ह्यातल्या कामेरी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कर्तव्यावर असताना वीरमरण आलेल्या या जवानांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली. या दोन जवानांच्या कुटुंबांना राज्य सरकारच्या वतीनं 1 कोटी रुपये आर्थिक मदत आणि इतर लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<u>रत्नागिरी-आयर्नमॅन</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणमधले डॉक्टर तेजानंद गणपत्ये यांनी फुल आयर्नमॅन ही जागतिक पातळीवरची स्पर्धा सलग दुसऱ्यांदा पूर्ण केली आहे. त्यांच्या प्रेरक कामगिरीविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**ऑस्ट्रेलियातल्या बसलटनमध्ये पार पडलेल्या जागतिक आयर्नमॅन स्पर्धेत 3800 मीटर अंतर पोहणं, 180 किलोमीटर सायकलिंग आणि 42 किलोमीटरहून अधिक अंतर धावणं हे तिन्ही क्रीडा प्रकार सलगपणे 17 तासांमध्ये पूर्ण करायचे होते. उंच लाटा, पाऊस, बोचरे वारे, थंड हवामान अशा आव्हानात्मक परिस्थितीत डॉक्टर तेजानंद यांनी 13 तास 52 मिनिटांमध्ये म्हणजे गेल्या वेळपेक्षा कमी वेळात ही स्पर्धा पूर्ण केली आणि आयर्नमॅन किताब मिळवला. गेल्या वर्षी कझाकस्तानमध्ये त्यांनी 15 तास 17 मिनिटांत स्पर्धा पूर्ण केली होती. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांनी हे देदीप्यमान यश कर्करोगाला हरवून मिळवलं आहे. 2019 मध्ये झालेल्या घशाच्या कर्करोगावर त्यांनी जिद्दीने मात केली आणि वैद्यकीय प्रॅक्टिस पुन्हा सुरू केली. दोन वर्षं कठोर प्रयत्न करून सायकलिंग, पोहणं, धावणं याचा कसून सराव केला. अनेक मॅरॅथॉनमध्ये सहभाग घेतला. कोल्हापूरचे आयर्नमॅन पंकज रावळू, आशिष रावळू यांच्याकडे त्यांनी प्रशिक्षण घेतलं. त्यांचं हे यश अभिमानास्पद आणि अत्यंत प्रेरक असल्याची भावना व्यक्त होत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**<u>हवामान सल्ला</u>**

राज्याच्या विविध भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे. अनेक भागात काल ढगाळ हवामान होतं. येत्या दोन दिवसात, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर काही भागात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचाही अंदाज आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाचे पुणे इथले ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर एस डी सानप यांनी शेतकऱ्यांना आवश्यक सल्ला दिला आहे......

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.